**नि.दिवाणी दावा क्रं.०३/२०२०**

**नि. क्रं.४३**

**:: प्रतिवादीकरिता उलटतपास अधिवक्ता श्री. एस.बी. पाटील यांच्यामार्फत शपथेवर सुरू. ::**

०६. वादी लक्ष्मण हा माझा भाऊ आहे. प्रतिवादी धोंडीबा हा माझा भाऊ रामरावचा मुलगा आहे. माझे धोंडीबासोबत पटते. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये सर्वे क्र.७३, नवीन भूमापन क्र.४५१ मधील प्लॉट क्र.१३ बाबत चुकीचे लिहीले. प्लॉट क्र.१३च्या दक्षिणेस भूमापन क्र.४५० हा रंगराव कारभारी यांचा आहे आणि उत्तरेकडील भूमापन क्र.४५२ हा नामदेव पाटील यांचा आहे. मी सरतपासामध्ये नमूद केलेल्या चतु:सिमा ह्या वादीच्या प्लॉटच्या आहेत. दि.१०/०५/१९८८ रोजीची खरेदी बाँडवर केलेली आहे. सदर बाँड ₹५/– चा होता. त्यावेळी रावसाहेबत बेळकोने, देवगीर महाराज, निळकंठ बाजीराव बिरादार हे साक्षीदार म्हणून हजर होते. मी सदर बॉड लिहिताना हजर नव्हतो. मी सदर बॉड बघितला आणि त्यावरून त्याबाबत कथन केले. मी बॉडवर साक्षीदार म्हणून सही केलेली नाही, कारण मी घरी आल्यानंतर मला बॉड दाखविला होता.

प्रश्न – चतु:सिमेतील प्लॉटच्या उत्तरेस असलेल्या भूमापन क्र.४५२ मधील प्लॉट क्र.१४ हा माझ्या मालकी व ताब्यात आहे, हा शपथपत्रामधील तुम्हाला काय सांगायचे ?

उत्तर – सदर प्लॉट क्र.१४ हा माझा होता मी तो विकलेला आहे.

०७. मी आजरोजी प्लॉट क्र.१३चा शेजारी नाही. मी प्लॉट क्र.१४ वर्ष १९८८ मध्ये विकला. प्लॉट क्र.१४ माझाच असल्याबाबत शपथपत्रामध्ये चुकीचे लिहिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्लॉट क्र.१३ वर खरेदी तारखेपासून वादीचा शांततामय उपभोग असल्याचे खोटे

सांगितले. साक्ष सरतपासातील परिच्छेद क्र.४ व ५ मधील मजकुराबाबत मला प्रत्यक्ष माहीत नाही. माझा साक्षप्रतिज्ञालेख वादीच्या सांगण्याप्रमाणे लिहिलेला असेल मला त्याबाबत माहिती नाही.

०८. प्रतिवादी धोंडीबाने वर्ष २००३ मध्ये हणमंत सदाशिव पाटील यांच्याकडून सर्वे क्र.७३ मधील ४५ x ४० चा प्लॉट विकत घेतला होता हे मला माहीत नाही. धोंडीबाने तहसील कार्यालयामधून प्लॉट अकृषक करून घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की, धोंडीबाच्या नावे प्लॉटची नोंद ग्रामपंचायत कार्यालयाला झालेली आहे व त्याचा मालमत्ता क्र.३५८ आहे. हे म्हणणे खरे आहे की, धोंडीबाच्या प्लॉटच्या पूर्वेला रस्ता व पश्चिमेला बोळ आहे व दक्षिणेला रंगराव पाटील यांचा प्लॉट आहे. हे म्हणणे खरे नाही की, धोंडीबाच्या प्लॉटच्या उत्तरेस नामदेव पाटील यांचा प्लॉट आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, पूर्वी नामदेव पाटीलचा प्लॉट उत्तरेस होता आणि आजरोजी गुंडेरावचा प्लॉट उत्तरेस आहे. धोंडीबाने सदर प्लॉटवर शौचालय, स्नानगृह आणि बैलासाठी पत्र्याचे शेड बांधलेले आहे, हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, धोंडीबा सदर जागेवर २०–२२ वर्षापासून काबीज आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीच्या सांगण्यावरून खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे ) ( श.अ. सुरजुसे )

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**.

दि.२१/०१/२०२६.